Vol 5 Issue 4 Jan 2016

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

International Online Multidisciplinary Journal
Review of Research
ISSN No : 2249-894X
Impact Factor 2.1002 (UIF) [Yr.2013]
3.1402 (UIF) [Yr.2014]
Save Tree, Save Paper, Save World
ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 4 | Jan - 2016





# भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनातील नागपूरचे झुंजार नेतृत्व जनरल मंचरशा आवारी यांच्या योगदानाची विश्लेषणात्मक समीक्षा

यमुना रेवतकर
अंशकालीन अधिव्याख्याता, इतिहास विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपुर

*सारांश –*
भारत देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये पारशी समाजाने स्वतःचे कर्तृत्व प्रदर्शित केलेले आहे. परंतू पारशी समाज हा अल्पसंख्याक असल्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची फारशी दखल घेतली गेली नाही. यास्तव पारशी समाजाचे श्री. मंचरशा रुस्तमजी आवारी यांनी स्वातंर्त्यलढ्यात सहभागी होऊन राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रप्रेमाचे जाज्वल्य उदाहरण प्रस्तुत केल्यामूळे नागपूरच्या इतिहासात त्याचे अन्यनसाधारण स्थान आहे.

## *प्रस्तावना*

भारत हा देश धार्मिक, वांशिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला देश आहे. भारतात अनेक धर्माचे लोक असून त्यात हिंदुची संख्या अधिक आहे. पारशी समाज हा भारतात प्रामुख्याने गुजरात तसेच महाराष्ट्रातील मुंबई आणि मुंबईच्या आसपास उद्योगधंदे असलेल्या प्रदेशात आढळतात.

नागपूरच्या विकासात पारशी समाजाचा फार मोठा सहभाग असून त्यांच्या या योगदानाचे ऐतिहासिक मुल्यमापन व्हावे त्याचप्रमाणे नागपूरच्या राजकीय इतिहासात श्री. मंचरशा रुस्तमजी आवारी यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घ्यावी म्हणून प्रस्तुत विषय निवडलेला आहे.

विदर्भाच्या इतिहासात ज्या काही राजकारणी व्यक्ती होऊन गेल्यात त्यामध्ये सर्वात वादळी व्यक्तीमत्व मंचरशा आवारी ह्यांचे आहे. सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही क्षेत्रात कर्तृत्व दाखविण्याची संधी त्यांना मिळाली. मंचरशानी वेळोवेळी पत्करलेला कारावास, प्रबोधनाच्या मार्गाने केलेली लोकजागृती, गांधी, नेहरु यांसारख्या मोठमोठया पुढाऱ्यांच्या बरोबरीने राष्ट्रीय चळवळीत घेतलेला उत्स्फुर्त सहभाग, अन्यायाविरुद्ध समर्थपणे दिलेली झुंज, निर्भिडपणे क्रांतिकारकांना केलेले सहाय्य व महात्मा गांधी यांच्या प्रेरणेने विविध चळवळीत घेतलेला स्वयंपूर्ण सहभाग, इत्यादी त्यांचा इतिहास घडविणाऱ्या आणि आजच्या काळात समाजाला प्रेरक असलेल्या स्मृती आहेत. भारताच्या स्वातंत्र्यलढयामध्ये पारशी समाजाचे योगदान मोलाचे आहे. भारताच्या इतिहासात दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, मॅडम भिकाजी कामा इत्यादी पारशी नेत्यांचे कार्य मोलाचे आहे. स्वातंत्र्य आंदोलनात नागपूरचे जनरल मंचरशा आवारी या पारशी नेत्याचे कार्य महत्वाचे आहे.

*जन्म व कौटुंबिक माहिती :—*

श्री. मंचरशा आवारीचा जन्म २६ मे १६६८ रोजी गुजरात राज्यातील सुरत जिल्हयातील ‘गणदेवी’ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रुस्तमजी आवारी व आईचे नाव हिराबेन आवारी होते. ते १४ दिवसांचे असतांना त्यांच्या आईचा मृत्यु झाला. त्यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या काकांनी जमशेदजी आवारींनी केले. जमशेदजी आवारी श्रीमंत जमीनदार असल्यामुळे ब्रिटिशांनी त्यांना ‘खानबहादूर’ अशी उपाधी दिली होती.

*शिक्षण :—*

मंचरशाचे पहिली ते सहावीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण ‘गणदेवी या गावातून झाले. सहव्या वर्गानंतरचे संपूर्ण शिक्षण मुंबईला त्यांच्या मामाकडे झाले. त्यांचे मामा मुंबईला एलफिंस्टन कॉलेजमध्ये पर्शीयन, उर्दूचे प्राध्यापक होते.

इ. स. १६१७ साली मंचरशानी मुंबई विद्यापीठातून मेकॅनिकल इंजीनियरिंगची पदवी प्रथम श्रेणीत प्राप्त केली. त्यासाठी त्यांना सर रुस्तम पसानीच्या हस्ते सुवर्णपदक देण्यात आले होते. मंचरशांना गुजराती, हिंदी, उर्दू, अरेबिक, तेलगु, इंग्रजी, मराठी, पर्शीयन इत्यादी भाषेचे ज्ञान होते. त्यांना खेळांत विशेष रुची होती. त्यात कुस्ती, बॉक्सींग, या व्यतिरिक्त योगा करण्याची आवड होती. वेगवेगळया प्रकारचे कुलूप बनविण्याची कला त्यांना अवगत होती. तसेच त्यांना फारसी भाषेतील काव्याबद्दल विशेष प्रेम होते.

इ.स. १६१७ साली मंचरशाला त्यांच्या काकांनी (जमशेदजी आवारी) अमेरिकेतील ‘डेट्राईट’ या शहरात ‘फोर्ड मोटर्स’ या कंपनीत प्रशिक्षणार्थी मोटरमेकॅनिकल म्हणून पाठविले होते. इ.स. १६१६ ला मंचरशा अमेरिकेवरुन परत आले. तेव्हा त्यांच्या काकांनी मंचरशाला ऑफ्रिकेतील ‘झांझीबार’ येथे उच्च दर्जांच्या घोडयाच्या फॉर्महाऊसवर व मसाल्याच्या व्यापारावर देखरेख ठेवण्याकरीता पाठविले. कारण त्यांचे काका मसाल्याचे व्यापारी होते व त्यांचा व्यवसाय मुंबई, उत्तर भारत, तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यापलेला होता.

त्याचवर्षी (इ.स. १६१६) भारतात जमशेटजी टाटांचा मुलगा रतन टाटा सोबत काकांची भेट झाली. या भेटीत रतन टाटांनी मंचरशाचे शिक्षण विचारात घेवून त्यांना नागपूरच्या एम्प्रेस मिलमध्ये ट्रेनी अधिकारी म्हणून रुजू होण्यास सांगीतले. मंचरशा नागपूरला आल्यावर सर्वप्रथम नागपूरची प्रसिद्ध ‘पारशी फर्म बैरामजी ॲण्ड कंपनीच्या’ रायपूर शाखेत नोकरी केली. परंतू आजारीपणामुळे त्यांनी रायपूरची नोकरी सोडली व नागपूरला ‘एम्प्रेस मिलमध्ये ट्रेनी अधिकारी म्हणून रुजू झाले.

मंचरशा आवारी बहुभाषा जाणणारे असल्यामूळे ते अनेक लोकांशी संपर्क साधू शकत असत. मंचरशा नागपूरातील महाल येथे महाजन यांच्या घरी पेंईगगेस्ट म्हणून राहत होते. महाजन हे समाजसेवक व कॉंग्रेसच्या सेवादल गटाचे कार्यकर्ते होते. त्यांच्या सहवासामुळे मंचरशा यांना राजकारणाची आवड निर्माण झाली. त्यामुळे मंचरशाचे संपूर्ण लक्ष स्वातंत्र चळवळीत असल्यामुळे मिलचे व्यवस्थापक श्री. कामदीन यांनी मंचरशाला मिलच्या नोकरीतून काढून टाकले. ही गोष्ट मंचरशाच्या स्वाभिमानाला पटणारी नव्हती. त्यामूळे त्यांनी एम्प्रेस मिल नं. ५ च्या समोर उपोषण सुरु केले. मंचरशाच्या पाच सात दिवसाच्या उपोषणानंतर मिलच्या व्यवस्थापकाने आपली हार मानली. तेव्हा स्वतः मंचरशानी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. स्वतःवर झालेला अन्याय त्यांनी सहन केला नाही, येथून त्यांची अन्यायाविरुद्ध लढण्याची तयारी झाली. अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी त्यांनी धरणे व उपोषण हा मार्ग चोखाळला जो नागपूरकरांना नवीन अनुभव देणारा ठरला. अशारीतीने त्यांनी आपल्या आयुष्यात प्रथमच अहिंसावादी सत्याग्रहाची सुरुवात केली. हाच त्यांच्या जीवनातील पहिला अहिंसावादी सत्याग्रह होता.

मंचरशा आवारी गांधीजीना आपले आदर्श मानीत होते. गांधीजींच्या विचारांचा त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला होता. इ. स. १६२० साली त्यांनी गांधीवादी कार्यकर्ता म्हणून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला.

महात्मा गांधीजींना आदर्श मानणारे मंचरशा आवारींनी नेहमीच त्यांच्या जीवनमूल्यांचे व जीवनपद्धतीचे अनुकरण केले. त्याचेच उदाहरण म्हणजे आयुष्यभर खादी वापरण्याचा त्यांनी दृढनिश्चय केला व प्रत्यक्षात या निर्णयांचे अनुकरणही स्वतःचे विदेशी वस्त्र (सूट, टाय व टोपी) जाळून केले.

तसेच विदेशी दुकानावर पिकेंटिंगचे कार्य करुन इतरांना विदेशी वस्त्रांचा त्याग करण्यासाठी प्रेरीत करीत असत आणि त्याचाच परिणाम म्हणून सन १६२१ –२२ साली मंचरशा आवारी नागपूर नगर कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीचे तसेच सी. पी. ॲण्ड बेरार (मध्यप्रांत) प्रांताचे प्रांतीक समितीचे सदस्य म्हणून निवडून आले. इ. स. १६२३ साली ते स्वयंसेवक गटाचेही प्रमुखही होते म्हणूनच जनता त्यांना ‘पक्का सैनीक’ असे संबोधित असे.

मंचरशा आवारींनी स्वतःला स्वातंत्र्य आंदोलनात पूर्णपणे झोकून दिले म्हणूनच इ. स. १६२३ च्या झेंडा सत्याग्रहाचे नेतृत्व करुन १४ महिन्यांची सक्त मजूरीची शिक्षा भोगली. २४ मार्च १६२४ ला त्यांची तुरुंगातून सुटका झाल्यावर त्याच दिवशी हातात तिरंगा ध्वज घेवून मिरवणूक काढली. राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रप्रेमाचे स्वतःचेच जाज्वल्य उदाहरण मंचरशा आवारींनी नागपूरकरांना घालून दिले.

मंचरशाचे वक्तृत्व ओद्यवती असल्यामूळे जनता त्यांच्यामूळे प्रभावित होत असे, म्हणूनच ते इ. स. १६२६–२७ साली नागपूर नगर कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आले व अध्यक्षपदी असतांनाच त्यांनी सी. पी. ॲण्ड बेरार प्रांताचे गव्हर्नर मॉंटेग्यू बटलरला नागपूर सोडण्याचा अंतिम आदेश दिला. इतकेच नव्हे तर १३ एप्रिल १६२७ ला प्रजासत्ताक फौज तयार करुन हातात तलवार घेवून हजारो लोकांसह मिरवणूक काढून ‘सशस्त्र सत्याग्रह’ केला व ब्रिटीशांचा शस्त्रकायदा मोडून काढला. अशी निर्भयता मंचरशांच्या रोमारोमात भिनली होती. मंचरशाचे हे धाडस बघून ब्रिटीश अधिकाऱ्यांनी त्यांना २४ मे १६२७ ला अटक केली व ४ वर्षाची सक्त मजूरीची शिक्षा ठोठावली.

मंचरशा आवारीच्या सशस्त्र सत्याग्रहाने नेताजी सुभाषचंद्र बोस प्रभावित झाले म्हणूनच नागपूर नगर पालिकेत जनरल

आवारींच्या तैलचित्राचे अनावरण नेताजीच्या हस्ते करण्यात आले होते. मंचरशाच्या प्रजासत्ताक फौजमधून प्रेरणा घेवूनच नेताजी सुभाषचंद्र बोसने 'इंडियन नॅशनल आर्मीची' स्थापना केली. तसेच गांधीजी सुद्धा मंचरशाच्या या कार्याने प्रभावित झाले व त्यांना 'जनरल आवारी' या नावाने संबोधीले. तेव्हापासूनच संपूर्ण जनता त्यांना मानाने 'जनरल मंचरशा आवारी' असे संबोधू लागली होती.

मंचरशाचा स्वभाव अतिशय दृढनिश्चयी असल्यामूळे तुरुंगातील पाशवी अत्याचारालाही स्वतःच्या तत्वनिष्ठेसाठी कठोर अत्याचार सहन करण्याची क्षमता त्यांनी नेहमीच प्रदर्शित केली.

मंचरशा आवारीने आयुष्यभर खादीची वस्त्र परीधान करण्याचा दृढनिश्चय केल्यामूळे तुरुंगात त्यांनी खादीच्या वस्त्राची मागणी केली. परंतू ती न देता विवस्त्र अवस्थेत त्यांना ठेवल्या जात असे व अनेक पाशवी अत्याचार केले जात असत. तरीही मंचरशा आवारी सर्व आपत्तीचा सामना करण्याची क्षमता नेहमीच ठेवीत असत.

तुरुंगातून सुटल्यानंतर ५ मे १९३१ ला मंचरशा आवारींचा नागपूर नगरपालिकेने मानपत्र देवून मोठा सन्मान केला. मानपत्रात त्यांच्या देशभक्तिचा, त्यागाचा, दलितांविषयीच्या प्रेमाचा गौरव करण्यात आला.

७ मे १९३१ ला पिकेटिंगचे कार्य करीत असतांना मंचरशा आवारीला पुन्हा पोलिसांनी अटक केली व दोन विभिन्न कलमाअंतर्गत ३ वर्षांसाठी सक्त मजूरीची शिक्षा फर्माविली तरीही १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात मंचरशांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यामूळे पुन्हा त्यांना ४ वर्षांची सक्त मजूरीची शिक्षा झाली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुरुंगात जाणे व तुरुंगातून परत येणे हा त्यांच्या जीवनाचा जणू एक अविभाज्य भागच बनला होता. अशाही परिस्थितीत त्यांच्या आयुष्यात ठाणे जिल्ह्यातील 'बोर्डी' गावाचे एक शिक्षक मिनीचेअर झायवाला यांची कनिष्ठ कन्या दलेरबानू या आल्या. मार्च १९३६ ला मंचरशा आवारी व दलेरबानू आवारी यांचा विवाह संपन्न झाला. श्री मंचरशाला चार अपत्ये होती त्यात मुलगी जेरताई आवारी मुलगा होशंग आवारी मुलगी झरीननौशेद रांदेलिया व मुलगा श्री. गेव्ह आवारी.

मंचरशा आवारी आपल्या कर्तव्याबाबत नेहमी दक्ष राहत असत म्हणून इ. स. १९३७ ला नागपूर नगर काँग्रेस समितीचे अध्यक्ष असतांना जनता दरबाराची संकल्पना मांडून जनतेप्रती आपले प्रेम स्पष्ट केले. त्यात जनतेच्या तक्रारी, आरोग्यासंबंधीच्या समस्या व कार्यालयीन इतरही बाबी जाणून घेतल्या व त्यांच्या निवारण्याचा मार्गही शोधून काढला होता. जनसंपर्क कसा ठेवायला पाहिजे व जनतेच्या समस्या जाणून त्या सोडविण्याची कळकळ कशी असावी याचा वस्तुपाठ जनरल मंचरशा आवारी यांनी स्वतःच्याच उदाहरणाने घालून दिला.

इ. स. १९३९ साली युरोपमध्ये दुसरे जागतिक युद्ध सुरु झाले. या युद्धात ब्रिटीशांनी भारतीयांशी सल्लामसलत न करता त्यांना जर्मनी विरुद्धच्या युद्धात गोवले. त्यांच्या निषेधार्थ ८ नोव्हेंबर १९३९ रोजी मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला तेव्हा मंचरशा आवारी ह्यांनीही आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

मंचरशा आवारीने नागपूरकर जनतेचे मन जिंकले होते. म्हणूनच इ. स. १९४७ ते १९५० या कालावधीत विधी समितीचे निरीक्षक, इ. स. १९५० ला ऑल इंडिया काँग्रेस समितीचे सदस्य म्हणून कार्य केले. तसेच इ.स. १९५१ ला किसान मजदुर प्रजापार्टीची स्थापना व १९५२ ला विधानसभेचे विरोधी पक्षनेता म्हणून निवडून आले.

विरोधी पक्षनेता असतांना त्यांनी विधानसभेत गरीबांच्या प्रश्नांना वाचा फोडली त्यात गरीबांच्या निवासाचा प्रश्न सोडविला, नागपूरची 'नागपूर इलेक्ट्रीक लाईट पावर' कंपनीचे सरकारीकरण होवू दिले नाही तसेच नागपूरचे मेडिकल कॉलेज रायपूरला नेवू दिले नाही. जेणेकरुन आशियातील सर्वात मोठे मेडिकल कॉलेज नागपूरला स्थापित करण्यात जनरल मंचरशा आवारी यांचा मोठा सहभाग होता. या कॉलेजमूळे नागपूरच्या शिरपेचात मानाचा तूरा खोचला गेला हे वास्तव नाकारता येणार नाही.

सत्तेपासून दूर राहूनच जनसेवाकरीता येते याची त्यांना पक्की खात्री होती. मंचरशा आवारींनी इ. स. १९५६ साली मुख्यमंत्रीपदाचा प्रस्ताव व इ. स. १९५९ साली गव्हर्नरपदाचा प्रस्ताव केवळ आपल्या तत्वाशी प्रामाणिक राहण्याच्या वृत्तीतून फेटाळून लावला यातूनच त्यांचा निस्वार्थीपणा व त्यागमय भूमिका दिसून येते.

***संदर्भग्रंथसुची –***


१आवारी, गेव्ह प्रत्यक्ष मुलाखत दि. २२/०७/२०१२

२आवारी, गेव्ह प्रत्यक्ष मुलाखत दि.  २८.०७.२०११

३आवारी, गेव्ह-प्रत्यक्ष मुलाखत दिनांक १० सप्टेंबर २०१२

४विद्यालंकार, सत्यदेव. ''शस्त्र सत्याग्रह के प्रवर्तक जनरल आवारी'' प्रथम आवृत्ती, असहयोग आश्रम नागपूर १९२७, पृष्ठ क्र. ३३

५जोशी, पघाकर लक्ष्मीकांत, ''नागपूर नगरसंस्था शताब्दि ग्रंथ'' नागपूर, महानगरपालिका नागपूर १९६४ पृष्ठ क्र. ४८.

६विद्यालंकार सत्यदेव; ''शस्त्र सत्याग्रह के प्रर्वतक जनरल आवारी'' (उनकी जीवनी और आंदोलन) प्रथम आवृत्ती, असहयोग आश्रम नागपूर १९२७, पृष्ठ क्र. १३.

७गिरडकर; रमेश; ''स्वातंत्र्य लढयातील नररत्न तथा ऐतिहासिक झेंडा सत्याग्रहाचे जनक; क्रांतीकारी; झुंजार अग्रगणी स्वातंत्र्य.

८संग्राम सेनानी स्व. जनरल आवारी'' वृत्तपत्र तरुण भारत दि. १ जुलै २०१२ पृष्ठ क्र. ३.

९पाठक, अरुणचंद; ''नागपूर जिल्हा भाग १'' दुसरी आवृत्ती दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन २००५; पृष्ठ. क्र. २०१४.

१०कोठेकर; शांता; अंधारे; भा. रा.; ''नागपूर नगरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ'' (१७०२-२००२); शासकीय मुद्रणालय नागपूर; २००३. पृष्ठ क्र. २१९.

११महालक्ष्मे अविनाश; ''नेताजीच्या आर्मीचे प्रणेते जनरल आवारी' वृत्तपत्र महाराष्ट्र टाईम्स नागपूर + विदर्भ १ जुलै २०१२, पृष्ठ क्र. १ ंबबमे कंजम १२ण्१२ण्२०१४ ढ्रूण्हसवइसमउंतंजीपण्बवउ विदर्भ झ
१२भारवे; बाळासाहेब; ''स्वातंत्र्य लढयातील नागपूर जिल्हयाचा सहभाग'' प्रथम आवृत्ती, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती नागपूर, ६ ऑगस्ट १९९२, पृष्ठ क्र. ५३.
१३जोशी; पद्याकर लक्ष्मीकांत; ''नागपूर नगरसंस्था शताब्दी ग्रंथ;'' नागपूर महानगरपालिका नागपूर १९९४; पृष्ठ क्र. ४८
१४भुसारी; सुरेश; '' ६ ऑगस्ट १९४२ 'स्वातंत्र्याचा एकच समरघोष करो या मरो' वृत्तपत्र – लोकमत दि. ६ ऑगस्ट २०१२ पृष्ठ क्र. १
१५गिरडकर; रमेश; – ''स्वातंत्र्याचा झुंजार सेनानी जनरल मंचरशा आवारी, वृत्तपत्रः– लोकसत्ता १ जुलै २०१०, पृष्ठ क्र. ३
१६ ।अंतपए ळमदमंसए ष्त्ले थ्तवउ ेलसनउष चंतज १ए ेीलवहं ेीतंउए छंहचनत ९ण ब्वजण १९३४ए च्हमण ४९ण
१७ळपतंकांत तुमीय टमजमतंद थ्तममकवउ थ्पहीजमत रुंजम ळमदमतंस डनदबींतेीं ।अंतपष छमे चेमत भ्पजूंकं १ श्रनसल २०००ए च्हण छवण १
१८ठींहूंहमत क्पसदंअं म्य ५। ळंदकीपंद ळमदमतंसष । ळींदकीपंद ंदक ंतकमदज चंजतपवज पमदमतंस उंदबीमतेीं ।अंतप ेचमंतीमंकमक जीम तिममवउ ेजतनहहसम पद छंहचनतए उंइंपदम चंतेपंदंए श्रनदम.श्रनसल २०००ए चंहम ३०ण

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* Directory Of Research Journal Indexing
* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database



Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org